


# • कन्यादान योजना •

महाराष्ट्र शासनाची योजना- सामुहिक विवाह सोहळ्यामध्ये विवाह करणाऱ्या मागासवर्गीय दांपत्यांना वस्तुरूपात देण्यात येणाऱ्या अनुदान रुपये 20,000/- इतकी रक्कम वधूचे वडील, आई किंवा पालकांना धनादेशाद्वारे देण्यात येते. तसेच सामुहिक विवाह सोहळा आयोजित करणाऱ्या विविध स्वयंसेवी संस्थांना प्रती जोडप्यांमागे रुपये 4000/- प्रोत्साहनात्मक अनुदान देण्यात येते.

## पात्रतेचे निकष :

1. वधू व वर महाराष्ट्र राज्याचे अधिवासी (Domicile) असले पाहिजेत.
2. नवदांपत्यांतील वधू / वर यापैकी दोन्ही किंवा एकजण हे अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती (धनगर व वंजारीसह) विशेष मागास प्रवर्ग व इतर मागास प्रवर्गातील असावेत.
3. दांपत्यापैकी वराचे वय 21 व वधूचे वय 18 वर्षापेक्षा कमी असू नये.
4. वधू व वर यांच्या प्रथम विवाहासाठीच हे अनुदान अनुज्ञेय असेल. तसेच सदरील योजनेचा लाभ विधवा महिलेस दुसऱ्या लग्नाकरिता देखील अनुज्ञेय राहील.
5. जातीचे प्रमाणपत्र सक्षम प्राधिकृत अधिकाऱ्याने दिलेले असावे.
6. बाल विवाह प्रतिबंध कायदा व हुंडा प्रतिबंध कायद्याअंतर्गत असलेल्या कोणत्याही कलमाचा भंग या दाम्पत्य / कुटुंब यांचेकडून झालेला नसावा, याबाबत लेखी प्रतिज्ञापत्र (Affidavit) सादर करणे आवश्यक आहे.
7. आंतरजातीय विवाह असल्यास त्यासाठी शासन निर्णय क्र. युटीए-१०९९/प्र.क्र.४५/मावक-२, दिनांक ३० जानेवारी, १९९९ नुसार जे फायदे मिळतात तेही फायदे अनुज्ञेय राहतील.

सामुहिक विवाह सोहळा आयोजित करणाऱ्या स्वयंसेवी संस्था / यंत्रणेचे निकष खालीलप्रमाणे.

1. स्वयंसेवी संस्था/यंत्रणा, स्थानिक नोंदणी अधिनियम, 1960 व सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, 1850 अंतर्गत नोंदणीकृत असावी.
2. सामुहिक विवाह सोहळ्यासाठी किमान 10 दांपत्ये (20 वधू व वर) असणे आवश्यक राहील.
3. सामुहिक विवाह सोहळा आयोजित करण्यासाठी क्षेत्रबंधन लागू होणार नाही.
4. सामुहिक विवाहासाठी कार्य करणारी स्वयंसेवी संस्था / यंत्रणा सेवाभावी असावी, व्यावसायिक नसावी.

5. सेवाभावी संस्था / यंत्रणेने आयोजित केलेल्या सामुहिक विवाह सोहळ्यामध्ये केला जाणारा खर्च हा संस्थेने करावा. त्यासाठी संस्था पुरस्कर्ते शोधू शकेल. मात्र अशा कार्यक्रमासाठी कोणत्याही प्रकारचे शासकीय अनुदान अनुज्ञेय राहणार नाही.

## अर्ज कसा करावा :

1. ज्या सामुहिक विवाह सोहळ्यामध्ये विवाह करावयाचा आहे त्या संस्थेमध्ये शासन निर्णयात दिलेल्या अर्जाच्या नमून्यानुसार शासन निर्णयात नमूद निकषानुसार परिपूर्ण अर्ज सादर करावा.
2. सदर संस्थेमार्फत एकूण प्राप्त अर्ज विवाह संपन्न होण्याच्या 15 दिवस अगोदर सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण कार्यालयात सादर करावे.

## संपर्क:

सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, भंडारा